| MHBI150009732021 | **नियमित दिवाणी दावा क्र.२३०/२०२१ मधील**<br>**निशाणी क्र.५३ वरील आदेश**<br>**कौशल्याबाई डोके वि. मुरलीधर पवार व इतर** |
| --- | --- |

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१२ यांनी त्यांना लेखी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांची लेखी कैफीयत स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने त्याचे म्हणणे अर्जावर नमुद केले आहे.

०२] प्रतिवादी व वादी यांच्या कथनांचे अवलोकन केले. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे प्रकरणातील महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने व त्यांच्या पतीचे अपघाती निधन झाल्यामुळे त्या मुदतीत त्यांची लेखी कैफीयत दाखल करु शकल्या नाहीत. त्यामुळे दिनांक ०८.०६.२०२२ रोजी त्यांच्याविरुध्द प्रकरण विना लेखी कैफीयत व विना म्हणणे चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रस्तुत दावा हा स्थावर मालमत्ते संदर्भात असल्याने त्यांची लेखी कैफीयत व लेखी म्हणणे दाखल करुन सत्य परिस्थिती न्यायालयासमोर आणणे आवश्यक आहे अन्यथा त्यांच्यावर अन्यायकारक होऊन त्यांचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब, त्यांचेविरुध्द दिनांक ०८.०६.२०२२ रोजी पारीत झालेला विना लेखी कैफीयत व विना म्हणणे प्रकरण चालविण्याचा आदेश रद्द करुन त्यांची लेखी कैफीयत व म्हणणे स्वीकारण्याची विनंती केली आहे.

०३] वादीने अर्जाच्या पाठीमागे आपले म्हणणे दाखल करुन कथन केले की, प्रतिवादी क्र.१२ ने जाणून-बुजून आपली लेखी कैफीयत देण्यास चार महिन्यांचा उशीर केला आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा किंवा जर अर्ज मंजूर करावयाचा असल्यास वादीला रु.१,०००/- कॉस्ट देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

०४] अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने प्रस्तुतचा दावा वाटप होऊन स्वतंत्र ताबा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१२ यांना समन्सची बजावणी होऊन त्या दिनांक ०७.०४.२०२२ रोजी प्रकरणात हजर होऊन देखील त्यांनी मुदतीत आपली लेखी कैफीयत दाखल केली नाही. प्रतिवादीला महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने व त्यांच्या पतीचे अपघाती निधी झाल्यामुळे त्या मुदतीत त्यांची लेखी

कैफीयत दाखल करु शकल्या नाहीत. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतींबाबत आहे. परिणामी पक्षकारांची मौल्यवान हक्क दाव्यामध्ये समाविष्ट आहेत. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१२ यांना दिनांक ०८.०३.२०२२ रोजी समन्स तामील होऊन त्या दिनांक ०७.०४.२०२२ रोजी प्रकरणात हजर झाल्या. त्यांनी दिनांक ०६.०६.२०२२ रोजी पर्यंत आपली कैफीयत दाखल करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी निर्धारीत कालावधीमध्ये आपली लेखी कैफीयत दाखल केली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रकरण विना लेखी कैफीयत चालविण्याचा आदेश पारीत झाला असे गृहीत धरण्यात आले. कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब लक्षात घेता प्रस्तुतचा अर्ज विचारात घेण्यायोग्य आहे. झालेल्या विलंबास प्रतिवादी यांना प्रकरणासंबंधीची महत्वाची कागदपत्रे न उपलब्ध झाल्याचे व त्यांच्या पतीचे अपघाती निधन झाल्याचे कारण नमुद केलेले आहे. दावा हा स्थावर मिळकतीबाबत असून प्रतिवादीचे मौल्यवान हक्क त्यामध्ये गुंतलेले आहेत. प्रतिवादींना संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादीचा अर्ज वादीला कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजुर केल्यास वादीला कोणताही उजर राहणार नाही. दावा अद्यापही पुराव्यास नेमलेला नाही. त्यामुळे दावा पुर्वीच्या स्थितीत जाईल असे नाही. म्हणून सदरचे कारण स्वीकारण्यायोग्य आहे. परिणामी अर्ज कॉस्टवर मंजूर करणे योग्य राहिल. सबब, खालील आदेश.

## आदेश

१) अर्ज कॉस्ट रक्कम रु.१००/- वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.१२ यांना वादीला रक्कम रु.१००/- कॉस्ट दिल्यानंतर त्यांना लेखी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन त्यांना त्यांची लेखी कैफीयत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ARTEE ASHOK PATIL
Date: 2022.12.12 17:17:26 +0530

दिनांक - १२.१२.२०२२

(श्रीमती ए.ए.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पाटोदा

**:: C E R T I F I C A T E ::**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
(R.M.Naik)
Steno Grade-III

(a) Dictated on : 12/12/2022
(b) Transcribed on : 12/12/2022
(c) Checked & signed on : 12/12/2022